N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

**(**कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता**)**

1. **District (**जिल्हा**):** गडचिरोली **P.S.(**ठाणे**):** अरमोरी

**FIR No.(**प्रथम खबर क्र.**):** 0205 **Year (**वर्ष**):** 2023

**Date and Time of FIR (**प्र. ख. दिनांक आणि वेळ**):**26/06/2023 23:07

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (**गुन्ह्याची घटना**):**

1. **Day(**दिवस**):** दरमियानी दिन

**Time Period (**कालावधी**):**

**Date From (**दिनांक पासून**):** 23/06/2023

**Date To (** दिनांक पर्यंत**):** 26/06/2023

**Time From (**वेळेपासून**):** 12:10 बजे

**Time To (**वेळेपर्यंत**):** 16:32 बजे

(b) **Information received at P.S. (**माहिती मिळालेले पोलीस ठाणे**):**

**Date (**दिनांक **):** 26/06/2023 **Time (**वेळ**):** 19:45 बजे

(c) **General Diary Reference (**रोजनामचा संदर्भ **):**

**Entry No. (**नोंद क्र.**):** 022

**Date & Time (**दिनांक आणि वेळ**):** 26/06/2023 20:01 बजे

4. **Type of Information (**माहितीचा प्रकार**):** Oral

5. **Place of Occurrence (**घटनास्थळ**):**

1.(a) **Direction and distance from P.S.(**पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर**):**

पश्चिम, 02 किमी **Beat No. (**बिट क्र.**):**

(b) **Address (**पत्ता**):** उप अधिक्षक भुमी अभिलेख कार्याल, भुमी अभिलेख कार्यालय,आरमोरी,आरमोरी

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (**या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास**):**

**Name of P.S.(**पोलीस ठाण्याचे नाव**):**

**District(State) (**जिल्हा**(**राज्य**)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** श्री.राजु पुंडलिक कांबळे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1986

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | मेंढेबोडी पोस्ट वैरागड ,आरमोरी ,अरमोरी,गडचिरोली,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | मेंढेबोडी पोस्ट वैरागड ,आरमोरी ,अरमोरी,गडचिरोली,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):** शेतकरी

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री.खुशाल मुखरुजी राखडे | | | 1. भुमी अभिलेख कार्यालय,भुमी अभिलेख कार्यालय,आरमोरी, आरमोरी,अरमोरी,गडचिरोली, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक सामान | संगणकाचे सुटे भाग | दोन 32 GB मेमरी कार्ड | 0.00 |

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

0.00

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद पोलीस स्टेशन आरमोरी दिनांक 26/06/2023 मी श्री. राजु पुंडलीक कांबळे, वय 37 वर्षे, धंदा- शेती रा. मेंढेबोडी पो. वैरागड ता. आरमोरी जि. गडचिरोली येथे राहत असुन दिनांक 22/06/2023 रोजी शिवाजी राठोड, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गडचिरोली यांचे समक्ष लोकसेवकांविरूद्ध लाच मागणी संबंधाने तक्रार नोंदविली. श्री शिवाजी राठोड, पोलीस निरीक्षक यांनी माझे सांगण्याप्रमाणे माझी तक्रार सहीनिशी घेतली आहे. मी दिलेली तक्रार खालीलप्रमाणे आहे. माझे वडील श्री. पुंडलीक रामा कांबळे, मोठे वडील श्री. संभा दामा कांबळे, श्री. पांडुरंग सुकरू कांबळे यांचे नावे मौजा मेंढेबोडी चक येथे साडे दहा ऐकर शेत जमीन असुन शेत जमीन मधुन पोट हिस्सा अलग करण्याकरीता माझे मोठे वडील श्री. संभा दामा कांबळे यांनी भुमी अभिलेख कार्यालय आरमोरी येथे मे-2023 मध्ये ऑनलाईन अर्ज केला होता. त्यानुसार दिनांक 13/06/2023 रोजी माझे मोठे वडीलांचे नावे पोट हिस्सा मोजनीचे नोटीस आले व दिनांक 21/06/2023 रोजी मोजणी असल्याचे कळविले.

त्याप्रमाणे दिनांक 21/06/2023 रोजी पोट हिस्याची मोजनी करणारे कर्मचारी श्री. खुशाल राखडे, भुकरमापक, भुमी अभिलेख कार्यालय आरमोरी हे मोजणी करण्याकरीता आमचे शेतावर आले. त्यावेळी मी माझे वडील, मोठे वडील असे हजर होतो. तेव्हा श्री.खुशाल राखडे, भुकरमापक यांनी मोठया आवाजात आरडाओरडा करून ''तुमची जमीन खालीवर व झाडे-झुडपे आहेत, त्यामुळे मला मोजणी करता येणार नाही, जर आज मोजनी करायची असेल तर तुम्ही मला 3,000/- रू. अगोदर दया, तेव्हा तुमची मोजणी करून देतो'' असे म्हणाल्याने, माझे मोठे वडील श्री. संभा दामा कांबळे हे घाबरून इच्छा नसतांना श्री. खुशाल राखडे, भुकरमापक यांना 3,000/- रू. दिले. तेव्हा त्यांनी शेतीची मोजणी करून दिली. त्यानंतर ''श्री. खुशाल राखडे, भुकरमापक, यांनी ''तुमच्या जमीनीमध्ये फरक आहे व 1 हेक्टर जमीन जास्त आहे ते मी मॅचअप करून क शिट तयार करून देतो, त्याकरीता पुन्हा मला 7,000/- रू. दयावे लागतील, नाहीतर तुम्हाला मोजणी करीता नव्याने अर्ज करून परत मोजणी करावी लागेल'' असे म्हणाले, तेव्हा मी सध्या आमच्याकडे ऐवढे पैसे नाही, तेव्हा त्यांनी ''ठिक आहे, तुमचे पैसे जमल्यानंतर, शुक्रवारी भुमी अभिलेख कार्यालय आरमोरी येथे येवुन भेटा, मी तुमच्या शेत जमीनीची जास्त फरक असलेली 1 हेक्टर जमीन मॅचअप करून, क शिट तयार करून ठेवतो.'' असे म्हणुन मला पैशाची मागणी केली आहे. श्री. खुशाल राखडे, भुकरमापक, भुमी अभिलेख आरमोरी जि. गडचिरोली यांनी मला माझे वडीलोपार्जीत शेत जमीनीच्या पोट हिस्याची मोजणी करून 1 हेक्टर जमीन जास्त आहे म्हणुन मॅचअप करून, क शिट तयार करून देण्याचे कामा करीता 7,000/- मागणी केलेली आहे. श्री. खुशाल राखडे, भुकरमापक, भुमी अभिलेख आरमोरी ता. आरमोरी जि. गडचिरोली यांना 7,000/- रु. लाच देण्याची माझी मुळीच ईच्छा नसल्याने मी 7,000/- रु. घेऊन आपले कार्यालया मार्फत कार्यवाही होणे करीता स्वेच्छेने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गडचिरोली येथे तक्रार देण्यास आलो.श्री. खुशाल राखडे, भुकरमापक, भुमी अभिलेख आरमोरी ता. आरमोरी जि. गडचिरोली यांचेशी माझा कोणताही वैयक्तीक वैर नसुन आर्थिक देवाण घेवाण अथवा भांडण नाही. म्हणुन मी त्यांचे विरुध्द कायदेशिर कार्यवाही करण्याकरीता स्वेच्छेने ला.प्र.वि. कार्यालय गडचिरोली येथे माझी लेखी तक्रार देत आहे. मी सोबत आणलेले रु. 7,000/- हे माझ्या वैयक्तिक बचतीतील आहे. श्री. शिवाजी राठोड, पोलीस निरीक्षक यांनी दोन शासकिय पंचांना पाचारण करून त्यांची व माझी ओळख करून दिली. श्री शिवाजी राठोड साहेब यांनी दोन्ही पंचांना थोडक्यात हकिकत सांगुन माझी स्वहस्ताक्षरात दिलेला तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिले. त्यानंतर सदरच्या तक्रार अर्जावर दोन्ही पंचांनी स्वाक्षरी केली. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. शिवाजी राठोड यांनी सुध्दा स्वाक्षरी केली.पो. नि.श्री. शिवाजी राठोड यांचे सुचनेवरून पोशि संदिप घोरमोडे यांनी व्हॉईस रेकॉर्डर कश्याप्रकारे काम करतो. याबाबत सविस्तर माहीती देवुन लाच मागणीची पडताळणी दरम्यानचे संभाषण डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरद्वारे रेकॉर्ड करण्यात येणार असल्याचे सांगीतले आणि सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सविस्तर सुचना दिल्या. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. शिवाजी राठोड यांनी माझेकडुन सापळा कारवाईसाठी वापरण्यात येणारी लाच रक्कम रू. 7,000/- ( 500/-रू. दराच्या 14 चलनी नोटा) घेतले. त्यानंतर सदरच्या नोटांचे क्रमांक नोंदवुन

घेण्यात आले व सदरच्या नोटांना अँथ्रॉसिन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन त्याचे गुणधर्म व प्रात्यक्षीक करून दाखवुन लाचेच्या रक्कमेस अँथ्रॉसिन पावडर लावली व याबाबतच्या सविस्तर नोंद पंचनामा क्रं. 1 मध्ये घेतल्या आहेत.दिनांक 23/06/2023 रोजी पडताळणी व सापळा कारवाई करण्याकरीता पोलीस निरीक्षक श्री. शिवाजी राठोड यांनी सांगितल्याप्रमाणे मी आरमोरी वनविभागाचे नर्सरी येथे हजर होतो. त्यानंतर पो.नि श्री शिवाजी राठोड, शासकिय पंच व स्टॉफसह शासकिय वाहनाने आले. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. शिवाजी राठोड यांनी पंचासमक्ष लाच मागणी पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगुन माझी अंगझडती घेवुन त्यानंतर व्हॉईस रेकॉर्डर मध्ये नवीन मेमोरी कार्ड टाकुन व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून व्हॉईस रेकॉर्डरवर पंच क्रं. 1 यांचे आवाजाचा नमुना घेवुन व्हॉईस रेकॉर्डर माझे जिन्स पॅन्टच्या समोरील डाव्या बाजूचे खिशात ठेवून मला पंच क्रं. 1 यांचे सह माझे स्वतःचे मोपेड दुचाकी क्र. एम एच-33-झेड- 6602 ने गैरअर्जदारास भेटण्यास भूमी अभिलेख कार्यालय आरमोरी येथे पाठविण्यात आले. तेव्हा गैरअर्जदार हे कार्यालयात हजर मिळून न आल्याने मी त्यांचे मोबाईल क्र. 7719068956 वर फोन लावले असता, श्री. खुशाल राखडे यांनी "मी नर्सींग होमजवळ आहे, ब्रम्हपूरी रोड वर नर्सींग होम जवळच आहो मी, असे बोलल्याने मी ब्रम्हपुरी रोडवरील नर्सींग होमजवळ गेलो. तेव्हा गैरअर्जदार श्री. खुशाल राखडे यांनी मला तुमची एक हेक्टर जमीन फरकात आहे म्हणून दुरूस्तीस पात्र लिहून देतो, साहेबाजवळ जाना करत बस, असे म्हणून कामासंबंधी बोलणी करीत असतांना मी गैरअर्जदार यांना त्यादिवशी तिनच दिले होते नाही का, आता सहा दया लागेल का सात दया लागेल असे बोलले असता, गैरअर्जदार यांनी देवून दे जा, असे म्हणून 7,000/- रू लाच रक्कमेची मागणी करून लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविली. त्यानंतर मी पंच क्रं. 1 सह पोलीस निरीक्षक श्री. शिवाजी राठोड यांचेकडे परत गेलो असता, पंच क्रं. 1 यांच्या आवाजानंतर व्हॉईस रेकॉर्डर बंद करण्यात आला.पो.नि.श्री. शिवाजी राठोड यांनी पंच क्रं. 1 व 2 यांचेसमक्ष व्हॉईस रेकॉर्डमध्ये झालेले संभाषण ऐकुण श्री. खुशाल राखडे यांनी मला माझे वडीलोपार्जीत शेतजमिनीच्या पोट हिस्याची मोजणी करून शेतजमीनीतील जास्त असलेली एक हेक्टर जमीन मॅचअप करून क शिट तयार करून देण्याचे कामाकरीता 7,000 /-रू लाच रक्कमेची मागणी करून लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविल्याची खात्री केल्याने गैरअर्जदार श्री. खुशाल राखडे, भूकरमापक यांचे विरूध्द सापळा कार्यवाही आयोजीत करण्याचे ठरविण्यात आले. त्यानंतर माझी अंगझडती घेवून पंचासमक्ष अँथ्रॉसिन पावडर लावलेली लाचेची रक्कम जिन्स पॅन्टच्या समोरील डाव्या खिशात ठेवण्यात आली. सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना देवुन गैरअर्जदार यांनी स्वतः किंवा इतर व्यक्तीच्या माध्यमातुन लाच रक्कम स्विकारल्यावर दर्शनी भागी येवून डोक्याला बांधलेला दुपट्टा सोडावे असा इशारा करण्याबाबत मला सांगीतले. त्यावेळी सापळा पथकातील सदस्य इशारा मिळताच लाच रक्कम स्विकारणाऱ्यास रंगेहाथ पकडतील असे सांगण्यात आले. पो.नि.श्री. शिवाजी राठोड यांचे सुचनेवरून पोशि संदिप घोरमोडे यांनी व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून व्हॉईस रेकॉर्डरवर पंच क्रं. 1 यांचे आवाजाचा नमुना घेवुन व्हॉईस रेकॉर्डर माझे जिन्स पॅन्टच्या डाव्या बाजूचे समोरील खिशात ठेवून मला पंच क्रं. 1 यांचेसह माझे स्वतःचे मोपेड दुचाकी वाहन क्र. एमएच-33-झेड-6602 ने गै.अ. यांचे भूमी अभिलेख कार्यालय आरमोरी येथे रवाना केले. त्याचवेळी सापळा पथकातील काही सदस्य गटा-गटाने माझे मागोमाग आले. त्यांनतर मी गैरअर्जदार यांना फोन लावले असता गैरअर्जदार हे भूमी अभिलेख कार्यालय आरमोरी येथे हजर असल्याचे सांगितल्याने मी भूमी अभिलेख कार्यालयात गेलो असता ते हजर मिळून आले व त्यांनी मला व पंचाला संशयास्पद नजरेने पाहु लागले, त्यावरून मला व पंचाला जाणवले की त्यांना काहीतरी संशय आलेला आहे, त्यामुळे आमचे कडुन पैसे घेण्याचे टाळुन, "मी बाजाराला जात आहे, तुम्ही मोठे साहेब आल्यावर भेटून घ्या, असे म्हणून गैरअर्जदार बाहेर निघून गेले व परत न आल्याने मी पंच क्रं. 1 सह पो.नि.श्री. शिवाजी राठोड यांचेकडे परत गेलो असता, पंच क्रं. 1 यांच्या आवाजानंतर व्हॉईस रेकॉर्डर बंद करण्यात आला.त्यानंतर पो.नि.श्री. शिवाजी राठोड यांनी पंच क्रं. 1 व 2 यांचेसमक्ष व्हॉईस रेकॉर्डमध्ये झालेले संभाषण ऐकुन व पंच क्र. 1 यांचे घडलेल्या परिस्थीतीच्या कथनावरून श्री. खुशाल राखडे, भूकरमापक यांनी मी बाजाराला जात आहे, तुम्ही मोठे साहेब आल्यावर भेटून घे असे बोलून बाहेर निघून गेल्याने व मोठे साहेब कार्यालयात हजर नसल्याने तसेच शनिवार रविवार हे शासकीय सुट्टीचे दिवस असल्याने सापळा कार्यवाही सोमवार दि. 26/06/2023 रोजी करण्याचे ठरविले. त्यानंतर गैरअर्जदार यांना देण्याकरीता माझे खिशात ठेवण्यात आलेली लाच रक्कम 7,000/-रू. काढून सदर लाच रक्कम लिफाप्यात सिलबंद करून पो.नि.शिवाजी राठोड साहेब यांनी आपले ताब्यात घेतले. व मला दि. 26/06/2023 रोजी आरमोरी येथील वनविभागचे नर्सरी येथे हजर राहण्याच्या सूचना दिल्या. याबाबतच्या सविस्तर नोंदी पंचनामा क्रं. 2 मध्ये घेतल्या आहेत. आज दि. 26/06/2023 रोजी सापळा कारवाई करण्याकरीता पो.नि.शिवाजी राठोड साहेब यांनी सांगितल्याप्रमाणे मी आरमोरी येथील वनविभागाचे नर्सरी येथे हजर होतो. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री शिवाजी राठोड, शासकिय पंच व स्टॉफसह शासकिय वाहनाने आले. त्यानंतर पो.नि.शिवाजी राठोड यांनी पंचासमक्ष सापळा कारवाई करण्यात येणार असल्याचे सांगुन माझी

अंगझडती घेवुन दिनांक 23/06/2023 रोजी सिलबंद केलेला लिफाफा पंचासमक्ष फाडुन त्यांतील अँथ्रॉसिन पावडर लावलेली लाचेची रक्कम फुल पॅन्टच्या समोरील डाव्या खिशात ठेवण्यात आली. सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना देवुन गैरअर्जदार यांनी स्वतः किंवा इतर व्यक्तीच्या माध्यमातुन लाच रक्कम स्विकारल्यावर दर्शनी भागी येवून डोक्याला बांधलेला दुपट्टा सोडावे असा इशारा करण्याबाबत मला सांगीतले. त्यावेळी सापळा पथकातील सदस्य इशारा मिळताच लाच रक्कम स्विकारणाऱ्यास रंगेहाथ पकडतील असे सांगण्यात आले. पो.नि.शिवाजी राठोड साहेब यांचे सुचनेवरून पोशि संदिप घोरमोडे यांनी व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून व्हॉईस रेकॉर्डरवर पंच क्रं. 1 यांचे आवाजाचा नमुना घेवुन व्हॉईस रेकॉर्डर माझे फुल पॅन्टच्या डाव्या बाजूचे समोरील खिशात ठेवून मला पंच क्रं. 1 यांचेसह माझे स्वतःचे मोपेड दुचाकी वाहन क्र. एमएच-33-झेड-6602 ने गै.अ. यांचे भूमी अभिलेख कार्यालय आरमोरी येथे रवाना केले. त्याचवेळी सापळा पथकातील काही सदस्य गटा-गटाने माझे मागोमाग आले. तेव्हा गैरअर्जदार हे कार्यालयात हजर मिळून आले व त्यांनी ''तुझे काम झाले आहे, प्रिंट काढले का काम झाले, असे बोलले तेव्हा मी साहेबांना भेटावा लागेल का पुन्हा, बाकी काही असे म्हणालो, तेव्हा गैरअर्जदार यांनी ''नाही'' असे बोलल्याने मी पंच क्रं.1 सह पोलीस निरीक्षक श्री. शिवाजी राठोड यांचेकडे परत गेलो असता, पंच क्रं. 1 यांच्या आवाजानंतर व्हॉईस रेकॉर्डर बंद करण्यात आले सविस्तर नोंद पंचनामा क्रं. 3 मध्ये घेतल्या आहेत. त्यानंतर पो.नि.शिवाजी राठोड यांनी पंच क्रं. 1 व 2 यांचेसमक्ष माझी अंगझडती घेवुन व्हॉईस रेकॉर्डमध्ये झालेले संभाषणा ऐकुन व पंच क्र.1 यांचे घडलेल्या परिस्थीतीच्या कथनावरून श्री.खुशाल राखडे,भूकरमापक यांना संशय आल्याने ते माझे कडुन पैशाची मागणी करणार नाही व माझेकडुन पैसे घेणार नाही असे मला वाटत असल्याने निवेदन सादर केले आहे. तरी दिनांक 23/06/2023 रोजी झालेल्या पडताळणी कारवाई दरम्यान श्री. खुशाल मुखरूजी राखडे, वय 39 वर्षे, पद- भूकरमापक (अभिलेखापाल), उपअधिक्षक भूमी अभिलेख कार्यालय आरमोरी ता. आरमोरी जि. गडचिरोली यांनी माझे वडीलोपार्जीत शेत जमीनीच्या पोट हिस्याची मोजणी करून 1 हेक्टर जमीन जास्त आहे म्हणुन ती मॅचअप करून, क शिट तयार करून देण्याचे कामा करीता 7,000/- रू. लाच रक्कमेची मागणी केल्याने त्यांचे विरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध कायद्यानुसार कायदेशीर फिर्याद आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (**केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.**)**

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(**प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले**):**

Sandip Punja Mandlik(I (Inspector)) / dgpspmm8902 **or (**किंवा**)**

(2) **Directed (Name of I.O.) (**तपास अधिका-याचे नाव**):**

**Rank (**पद**):** **No.(**क्र.**):**

**to take up the Investigation (**ला तपास करण्याचे अधिकार दिले**) or (**किंवा**)**

(3) **Refused investigation due to (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला**):**

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Sandip Punja Mandli
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): dgpspmm8902

संभाजी झिंजुर्डे
पोलीस उपनिरिक्षक
पोलीस स्टेशन, आरमोरी

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र): Physical features, deformities and other details of the ( If known / seen )(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(**जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.**)**